# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## आजपर्यंत विद्यापीठांनी संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीव्दारे संशोधन शिफारशी केलेले पिकनिहाय तंत्रज्ञान

**सामाजिक शास्त्रे :**

१. रोपवाटिका व्यवसायामुळे रोपवाटिकाधारकांच्या सामाजिक व आर्थिक स्तरामध्ये सकारात्मक बदल होत असल्यामुळे परवाना रोपवाटिकाधारकांना सक्षम करण्यासाठी शासनाकडून धोरणात्मक नियमात बदल करुन त्यांना कमी व्याजदरात पतपुरवठा करण्याची शिफारस करण्यत येत आहे. (२०१४)

२. कोकणामध्ये शेळीपालन व्यवसाय वाढीकरीता उद्योजकांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्याबरोबरच त्यांना शेतात व घरी भेट देवून तसेच पशु आरोग्य शिबीर आणि निदान चमू दौरे आयोजित करुन तांत्रिक मार्गदर्शन करण्याची शिफारस करण्यात येत आहे. (२०१४)

३. उत्तर कोकण किनारपट्टीसाठी पीक उत्पादन, दुग्धव्यवसाय अणि शेळीपालन या शेतीपध्दतीतून रोजगार व प्रती माणशी जास्त उत्पन्न मिळत असल्याने या शेतीपध्दतीचा अवलंब करण्यासाठी शेतक-यांना प्रोत्साहीत करण्याची शिफारस करण्यात येते. (२०१४)

४. शेतक-यांच्या शेतावरील प्रयोगाद्वारे (ई.सी.एफ.) २१.३१ टक्के रोजगार निर्मिती आणि ८४.१३ टक्के उत्पन्नामध्ये वाढ झालेली दिसून आली. म्हणून शिफारशीत कृषि तंत्रज्ञानाचा परिणामकारक प्रसार होण्यासाठी यासारख्या योजना विस्तार यंत्रणेमार्फत राबिवणेची शिफारस करण्यात येते. (२०१४)

५. अर्थशास्त्रीय विश्लेषणातून असे दिसून आले की, ३० शेळयांच्या कळपाचा खर्च विक्रिच्या किंमतीतून वजा जाता किफायतशीर आहे. म्हणून किफायतशीर शेळी पालनासाठी किमान ३० शेळयांच्या (२८ मादी आणि २ नर) कळपाची शिफारस करण्यात येते. (२०१४)

**विस्तार शिक्षण :**

१. कृषि खात्याने महिला आणि युवक यांच्यातील उद्योजकता विकास, महिलांचे सबलीकरण, कृषि मालावरील प्रक्रिया व निर्यात, अपारंपारिक उर्जास्त्रोतांचा वापर या महत्वपुर्ण विषयांचा प्रशिक्षण कार्यक्रमात समावेश करावा. त्याचप्रमाणे शेतक-यांचा वापर या महत्वपुर्ण विषयांचा प्रशिक्षण कार्यक्रमात समावेश करावा. त्याचप्रमाणे शेतक-यांच्या प्रशिक्षण गरजांवर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावे. (२००६)

२. कृषि खात्याने प्रशिक्षण उद्योजकांना प्रशिक्षणांचे नियोजन व त्यांची अंमलबजावणी, प्रशिक्षणोत्तर पाठपुरावा आणि प्रशिक्षणातील महत्वपुर्ण टप्प्यांबाबत स्थितीज्ञान (Orientation) द्यावे. (२००६)

३. कोकणातील महिला बचतगटांच्या सदस्यांचे सक्षमीकरणासाठी त्यांना शेळीपालन व काजू प्रक्रिया व्यवसाय सुरु करण्यास प्रोत्साहन देण्यात यावे आणि उच्च दर्जाच्या उत्पादनांची निर्मिती एका ब्रँड नावाने विक्री आणि विक्री व संभाषण कौशल्य इत्यादी संबंधी प्रशिक्षण व मदत देण्यात यावी. (२००८)

४. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या अभ्यासावरुन, विद्यापीठाच्या दत्तक खेडयांमध्ये प्रामुख्याने कुक्कुटपालन, भाजीपाला लागवड, दुग्धव्यवसाय आणि शेळीपालन या विषयावर प्रशिक्षण आयोजित करुन व्यवसायात स्थैर्य येईपर्यंत प्रशिक्षणार्थींचा पाठपुरावा करण्याची शिफारस करण्यात येत आहे. (२००९)

५. ग्रामविकास व कृषि विकासात महिला ग्रामपंचायत सदस्यांचा सहभाग वाढविण्यासाठी, तसेच त्यांच्या नेतृत्व विकासासाठी त्यांना ग्रामविकास खाते व विस्तार यंत्रणांनी प्रशिक्षणाद्वारे विकास कार्यक्रमांची माहिती देऊन प्रोत्साहित करावे. (२०१०)

६. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामुळे लाभार्थींचे उत्पन्न (५६.३५ टक्के), रोजगार (५२.९४ टक्के), जमिन वापर (६२.३४ टक्के) यात वाढ झाल्याचे दिसून आले. तथापि, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अधिक प्रभावी होण्याकरीता चांगल्या प्रतिची कलमे/रोपे यांची वेळेवर व अधिक प्रमाणात उपलब्धता, दरवर्षी खर्चाचे निकष सुधारणे आणि लाभार्थींची राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामध्ये निवड झाल्यानंतर प्रशिक्षण देण्यात यावे अशी शिफारस करण्यात येते. (२०१२)

७. गळीतधान्य पिकांची उत्पादकता व पिकांच्या सुधारित जातीखालील क्षेत्र वाढविण्यासाठी विस्तार यंत्रणांनी प्रथम रेषीय प्रात्यक्षिके समुह पध्दतीने आयोजित करावीत अशी शिफारस करण्यात येते. (२०१३)

८. कृषि महाविद्यालय विकास गटातील शेतकऱ्यांवर विस्तार शिक्षण उपक्रमांचा झालेल्या परिणामांच्या अभ्यासाच्या आधारे अशी शिफारस करण्यात येते की, विद्यापीठांनी महाराष्ट्र शासनाच्या मदतीने आवश्यक व पुरेसे मनुष्यबळ, पुरेशा सोईसुविधा व आर्थिक तरतूद करुन कृषि महाविद्यालयांच्या विकास गटांचे बळकटीकरण करण्यात यावे. (२०१६)

९. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत एकात्मिक पीक व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्पाच्या परिणामांच्या अभ्यासाद्वारे अशी शिफारस करण्यात येते की, कोकण विभागात विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंब वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मदतीने राष्ट्रीय कृषि विकास योजनेतील तंत्रज्ञान प्रसार प्रकल्पाच्या धर्तीवर एक खास तंत्रज्ञान प्रसार प्रकल्प कोकण विभागासाठी राबविण्यात यावा. (२०१६)

१०. रायगड जिल्ह्यातील भाजीपाला लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या उद्योजकता वर्तणुकीच्या अभ्यासाच्या आधारे अशी शिफारस करण्यात येते की, रायगड जिल्ह्यातील भाजीपाला लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांची उद्योजकता वर्तणूक वाढीस लागण्यासाठी त्यांना उद्योजकता विकास प्रशिक्षण देण्यात यावे आणि त्यांना भाजीपाला गटशेती करण्याकरिता प्रोत्साहित करण्यात यावे. (२०१६)

**कृषि अर्थशास्त्र :**

१. कोकण विभागात उन्हाळी हंगामात विहिरीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी, तसेच रबी पिकांसाठी संरक्षित सिंचनाची व्यवस्था करण्यासाठी नदी-नाल्यांवर कमी खर्चिक कोकण विजय बंधारे बांधण्यात यावेत. (२०१०)

२. कोकण विभागात प्रतीवर्षी पर्यावरणीयदृष्ट्या उपयुक्त व लागवडीखालील क्षेत्रापैकी अनुक्रमे १२.७ व ३.० टक्के क्षेत्राचा बदल अकृषिक वापरासाठी होतो. त्या अनुषंगाने राज्य शासनाने पर्यावरणीयदृष्ट्या उपयुक्त व लागवडीखालील क्षेत्राचा अकृषिक क्षेत्रामध्ये होणारा बदल नियंत्रित ठेवण्यासाठी आवश्यक धोरण ठरविण्याची शिफारस करण्यात येते. (२०१३)

३. शेततळ्यातील मत्स्य शेतीमध्ये लाभ-खर्च गुणोत्तर २.४० मिळत असल्याने फायदेशिर आहे, म्हणून अशी शिफारस करण्यात येते की, रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कौटुंबिक स्तरावर वर्षभर रोजगार निर्मिती आणि उत्पन्न मिळविण्यासाठी शेततळ्यात मत्स्य शेती करण्यास प्रवृत्त करावे. (२०१६)

**कृषि सांख्यिकी :**

१. महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयांमध्ये पाच वर्षांच्या अंतराने १९८२ ते २००२ या कालावधीत विविध खरीप पिकांखालील असणा-या क्षेत्राचा फेरबदलाचा अभ्यास करण्यात आला. तसेच प्रत्येक पिकांच्या क्षेत्रात बदल याचाही अभ्यास करण्यात आला. या २० वर्षांच्या जिल्हानिहाय अभ्यासात असे आढळून आले की, कोकण विभागातील चारही जिल्हयांमध्ये विविध पिकांखालील क्षेत्रात फेरबदल दिसून आला नाही. (२००४)